वित्तीय मान्यते बाबत.
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात, लेखाशिर्ष २४०१ २४४२ खालील ३६- सहाय्यक अनुदाने (वेतन) करीता मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ७० % चे मर्यादेत तरतुदी वितरीत करण्यास मान्यता बाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्व्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.आकृवि -३९१८/प्र.क्र.११७/१५-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय(विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-०९ मे, २०१८.

वाचा : १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल, २०१८.
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.अंदाज-२०१८/(प्र.क्र.५५)/२-अे, दि.०६ एप्रिल, २०१८.
३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, सम क्रमांक, दिनांक २३ एप्रिल, २०१८.

शासन निर्णय :-

कृषि विभागाच्या,जिल्हापरिषदेकडील १६३५ अधिकारी/कर्मचारी पदांच्या सुधारित आकृतीबंधास शासन मान्यतेनंतर, लेखाशिर्ष २४०१ २४४२, विशेष घटक योजनेखाली खते, बी-बियाणे इत्यादींसाठी अर्थसहाय्य, खालील बाब, **३६-सहायक अनुदाने (वेतन),** सन २०१८-२०१९ करीता मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ७० **%** चे मर्यादेत तरतूदी वितरीत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. उपरोक्त नमुद लेखाशिर्ष २४०१ २४४२, विशेष घटक योजनेखाली खते, बी-बियाणे इत्यादींसाठी अर्थसहाय्य, या खालील बाब, **३६-सहायक अनुदाने (वेतन) करिता** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या (**रू.१८.०० कोटी**) ७० **%** चे मर्यादेत तरतुद रूपये **रू.१२.६० कोटी** (**रूपये बारा कोटी साठ लाख फक्त**) तरतुद वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे, सन २०१७-२०१८ च्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुण देण्याचे अधिन राहून, वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी मंजूर प्रयोजनासाठीच खर्च करण्यात येईल, याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी.

३. या प्रित्यर्थ होणारा खर्च सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर केलेल्या अनुदानातून खालील लेखाशिर्षाखाली करण्यात यावा.

मागणी क्रमांक डी-३
२४०१, पिकसंवर्धन
(००)८०० इतर खर्च

(००) (०२) विशेष घटक योजना-
विशेष धटक योजनेखाली अर्थसहाय्य **(रूपये १२.६० कोटी)**
३६-सहायक अनुदाने (वेतन)
(२४०१ २४४२)

४. हे आदेश, वित्त विभागाचे परिपत्रक, क्र. अर्थसं -२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२ एप्रिल, २०१८ मधील अटी व शर्तीचे अनुपालन यांचे अधीन राहून प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०५१०११४२१७६३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh Madhukar Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab39865278090eca38793fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.05.10 11:42:48 +05'30'

(उ. म. मदन)
अवर सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व विभागीय आयुक्त (महसुल)
३. सर्व, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (द्वारा आयुक्त , (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
४. सर्व, विभागीय कृषि सह संचालक
५. सर्व ,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ((द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरिक्षा) मुंबई/नागपूर
७. सर्व, जिल्हा कोषागार अधिकारी (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
८. सर्व , कृषि विकास अधिकारी, (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
९. सर्व, उप विभागीय कृषि अधिकारी, (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
१०. सर्व, तालुका कृषि अधिकारी, (द्वारा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
११. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१२. कार्यासन (२-अे) कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती /१५-अे.